**<u>ठळक बातम्या</u>**

- नागपूर जिल्ह्यात कारखान्यातल्या स्फोटात १७ जणांचा मृत्यू, १८ जखमी, मुख्यमंत्र्यांकडून चौकशीचे आदेश, मृतांच्या कुटुंबाना ५ लाख रुपयांची मदत

- चालू हंगामात विक्रमी साखर उत्पादन करून महाराष्ट्र उत्तर प्रदेशाला मागे टाकेल असा भारतीय साखर आणि जैव ऊर्जा उत्पादक संघटनेचा अंदाज

- अमेरिका आणि इस्राएलच्या हल्ल्यात अयातुल्ला खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर इराणचे हंगामी नेते म्हणून अयातुल्लाह अलिरेझा अराफी यांची नियुक्ती

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत वेस्ट इंडीजबरोबरच्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा भारताचा निर्णय

**<><><><><>**

नागपूर जिल्ह्यात काटोलजवळ राऊळगाव इथं आज सकाळी एका कारखान्यात झालेल्या स्फोटात १७ जणांचा मृत्यू झाला, तर १८ जण जखमी झाले. खाणकाम आणि औद्योगिक वापरासाठी स्फोटकं तयार करणाऱ्या कारखान्यात हा स्फोट झाल्याचं स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरु असून, एनडीआरएफ आणि एसडीआरएफ चं पथक मदतकार्य करत असल्याचं जिल्हाधिकारी बिपिन इटनकर यांनी सांगितलं....

**होल्ड- बाईट- जिल्हाधिकारी**

या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दुःख व्यक्त केलं असून, मृतांच्या वारसाला राज्यशासनातर्फे ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची

मदत जाहीर केली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

<><><><><>

चालू हंगामात विक्रमी साखर उत्पादन करून महाराष्ट्र उत्तरप्रदेशाला मागे टाकेल असा अंदाज भारतीय साखर आणि जैव ऊर्जा उत्पादक संघटनेनं वर्तवला आहे. देशातलं एकूण साखर उत्पादन ३ कोटी २० लाख टनापेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे. यात महाराष्ट्राचा वाटा एक कोटी दहा लाख टनापेक्षा जास्त, तर उत्तरप्रदेशाचा वाटा सुमारे एक कोटी टन इतका राहील. गेल्या हंगामात महाराष्ट्रानं ९० लाख टन साखर उत्पादन केलं होतं तर उत्तर प्रदेशाचं साखर उत्पादन एक कोटी टन इतकं होतं.

<><><><><>

मुंबई-विजयदुर्ग दरम्यानची रो-रो सेवा आजपासून सुरु झाली. आठवड्यात दोन दिवस ही सेवा उपलब्ध राहील. त्यानुसार दर बुधवार आणि शनिवारी मुंबईत भाऊचा धक्का इथून विजयदुर्गसाठी रो-रो बोट रवाना होईल, तर गुरुवार आणि रविवार या दिवशी विजयदुर्ग इथून ती मुंबईत येईल. या सेवेमुळे मुंबई-विजयदुर्ग दरम्यानचा प्रवासाचा वेळ निम्म्यावर येणार असून, कोणवासीयांना त्याचा लाभ मिळेल.

<><><><><>

देशाला सामाजिक एकतेची सर्वाधिक गरज असताना हिंद दि चादर या सारख्या कार्यक्रमातून गुरू आणि संताचा आशीर्वाद आपल्यासोबत असल्याचा विश्वास मिळतो असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी मुंबईत आयोजित हिंद दि चादर कार्यक्रमात व्हिडिओ संदेशाच्या माध्यमातून त्यांनी संबोधित केलं. देशातल्या सर्व समाजातल्या नागरिकांनी शीख समाजातल्या गुरूंपासून प्रेरणा घेतली असं ते म्हणाले.

शीख धर्मातल्या सर्व १० गुरूंनी धर्म रक्षणाचंच काम केलं. जागतिक पातळीवर या गोष्टी अनुकरणीय असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यावेळी म्हणाले. संत सेवालाल महाराज, पोहरा देवी आणि संत नामदेव यांना यावेळी शहा यांनी नमन केलं.

**- - होल्ड.. बाईट- अमित शहा - -**

नवी मुंबईत गुरू तेग बहादुर यांच्या नावानं नवीन रुग्णालय सुरू करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या सभेत दिलं. शालेय अभ्यासक्रमात तेग बहादुर यांच्या

बलिदानावर आधारित धडा समाविष्ट करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतल्याची माहिती त्यांनी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवारही यावेळी उपस्थित होते.

गुरू तेग बहादुर यांच्या साडेतीनशेव्या शहीद दिनानिमित्त आयोजित हिंद-दी-चादर या कार्यक्रमाला नवी मुंबईत खारघर इथे ओवे मैदानात सुरुवात झाली. दोन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाला १५ लाखांहून अधिक भाविक येण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

नाशिक इथं विश्व मराठी संमेलनात आज 'मराठी भाषेतला युवावर्गाचा सहभाग' या विषयावर चर्चासत्र झालं. जेन झी ची भाषा आणि आधीच्या पिढीच्या भाषेत मोठं अंतर पडलं असून जुन्या पिढीला जेन झीची भाषा स्वीकारावी लागेल, असं मत या चर्चासत्रात सहभागी मान्यवरांनी मांडलं. चंगळवादी संस्कृतीमुळे काही प्रश्न निर्माण झाले आहेत, मात्र आपली मूळ संस्कृती टिकून आहे तोपर्यंत चंगळवादाचं अतिक्रमण होणार नाही असा सूर चर्चासत्रात व्यक्त करण्यात आला. विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, अतिरिक्त पोलीस महासंचालक विश्वास नांगरे पाटील यांनी या चर्चेत भाग घेतला.

आज **'अभ्यासक्रमातील मराठी भाषा'** या विषयावरही परिसंवाद झाला. यात उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू रवींद्र कुलकर्णी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, सिद्धपूर येथील महाराष्ट्र भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी भाग घेतला.

**<><><><><>**

अमेरिका आणि इस्त्राएलच्या हल्ल्यात इराणचे नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर इराणचे हंगामी नेते म्हणून धर्मगुरू अयातुल्लाह अलिरेझा अराफी यांची नियुक्ती झाली आहे. इराणच्या संवैधानिक प्रक्रियेनुसार पुढचा उत्तराधिकारी निवडला जाईपर्यंत ते या पदाचं काम पाहतील, असं इराणच्या सरकारी वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

अमेरिका आणि इस्त्रायलनं काल केलेल्या हवाई हल्ल्यात इराणचे लष्करप्रमुख आणि संरक्षण मंत्री देखील मृत्युमुखी पडल्याचं वृत्त आहे. या हल्ल्यात इराणचे ४० पेक्षा जास्त सरकारी अधिकारी मारले गेले, किमान २०१ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ७०० पेक्षा जास्त नागरिक जखमी झाले.

हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी इराणनं संपूर्ण मध्यपूर्वेत हल्ले सुरु केले आहेत. दुबई, दोहा, बहरीन आणि कुवेतमध्ये अमेरिकेचे लष्करी तळ असलेल्या किंवा अमेरिकेशी संबंधित ठिकाणी इराणने हल्ले केल्याचं वृत्त आहे.

या युद्धाच्या तणावामुळे दुबई विमानतळावरची उड्डाणं अनिश्चित काळासाठी स्थगित केली आहेत. या विमानतळाबाहेर काही तासांपूर्वी स्फोट झाला होता. या वेळी दुबई विमानतळावर अडकलेली भारताची बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधू हिला सुरक्षित स्थानी हलवलं आहे. पुण्यातल्या Indira School of Business Studies चे ८४ विद्यार्थी या विमानतळावर अडकून पडले, मात्र ते सुरक्षित असल्याचं या संस्थेचं स्पष्ट केलं आहे.

<><><><>

पश्चिम आशियात पेटलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं तिथल्या भारतीयांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. भारतीय दूतावास रात्रंदिवस मदतीसाठी उपलब्ध असतील असं त्यात म्हटलं आहे.

<><><><>

कॅनडाचे महसूल मंत्री फ्रँकोइस-फिलिप शॅम्पेन, आणि कॅनडातल्या न्यू ब्रन्सविक राज्याच्या प्रीमियर सुसान होल्ट यांच्यासह आलेल्या शिष्टमंडळासाठी आज मुंबईत स्वागत समारंभ आयोजित केला गेला. यात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल  सहभागी झाले. महाराष्ट्र हवामान बदलाच्या संकटांना सामोरं जात प्रगती करत आहे, कॅनडाला राज्यात गुंतवणूक करण्याच्या अनेक संधी आहेत, त्यामुळे कॅनडातले उद्योजक, शैक्षणिक संस्थांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

नवी मुंबई इथं आंतरराष्ट्रीय 'एज्युसिटी' उभारली जात आहे, या ठिकाणी विदेशातील नामांकित विद्यापीठं आपलं शैक्षणिक दालन उघडणार आहेत. कॅनडातल्या विद्यापीठांनीही 'एज्युसिटी' मध्ये आपली शैक्षणिक दालनं उघडावीत असं मुख्यमंत्री म्हणाले.

<><><><>

नागपूर जिल्ह्यातल्या धारणी इथं दोन हजार लिटर क्षमतेच्या बल्क मिल्क कुलरचं उद्घाटन आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं झालं. बल्क मिल्क कुलरची सुविधा उपलब्ध होणं मेळघाटसाठी परिवर्तनाची नांदी असून यामुळे दूध उत्पादनाला

नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला. या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल, आरोग्य व्यवस्था सुधारेल, मेळघाटमधे कुपोषणमुक्तीसाठी या उपक्रमाची मदत होईल, असं गडकरी म्हणाले.

<><><><><>

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या सुपर एट फेरीत आज कोलकता इथं भारताचा सामना वेस्ट इंडिजशी होत आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

उपांत्य फेरीत स्थान मिळवण्यासाठी भारताला हा सामना जिंकणं आवश्यक आहे.

सुपर एटमधे आज दिल्लीत झालेल्या सामन्यात दक्षिण अफ्रिकेनं झिंबाब्वेवर ५ गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना झिंबाब्वेनं ७ गडी गमावून १५३ धावा केल्या. दक्षिण अफ्रिकेनं ही धावसंख्या ५ गड्यांच्या मोबदल्यात १८ व्या षटकातच पार केली.

<><><><><>

गेल्या २४ तासात विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात वाढ झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//